
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME-I
ISSUE-XX

Oct-Dec.2017



UGC Approved
Sr.No.45681
Power of Knowledge, An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Govt. College of Arts & Science Aurangabad

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

E-mail : powerofknowledge3@gmail.com    www.powerofknowledge.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | अकाल मे भारतीय अर्थव्यवस्था प्रगती मे सबसे आगे | प्रा.डॉ. शिवाजी भ. यादव | ५७ |
| १५ | जिल्हा नियोजन व विकास प्रक्रियेत जिल्हा नियोजन समितीची भूमिका: बीड जिल्हा एक अभ्यास | डॉ.राजेंद्र जी. गोडबोले, डॉ.सुहास आर. मोराळे | ६० |
| १६ | Samrat Upadhyay's 'Arresting God in Kathmandu': A Reflection of Distracted Relationship in Nepalese Society | Digambar Madhukarrao Date | ६४ |
| १७ | इतिहास लेखनातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह | प्रा.प्रभाकर मिरकड | ७० |
| १८ | मनाची वारूळं' या ललित लेखसंग्रहातील निसर्गाचा आपुलकीपणा | प्रा. डॉ. दादासहेब गिऱ्हे | ७२ |
| १९ | गृहव्यस्थापनामध्ये गृहिणीचे योगदान | डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे | ७४ |
| २० | मराठी भाषेपुढील आव्हाने | डॉ. रेखा वाघ | ७८ |
| २१ | महिला सबलीकरणाची सामाजिक अपरिहार्यता | प्रा. राजेंद्रकुमार घाडगे | ८१ |
| २२ | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि स्त्रिया | प्रा. लक्ष्मण करपे | ८५ |
| २३ | बाबाराव मुसळे यांचे कथालेखान | डॉ. सोपान सुरवसे | ८७ |
| २४ | लोकसाहित्य संज्ञा व स्वरुप | डॉ.भाऊसाहेब राठोड | ९४ |
| २५ | ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य काही विचार | डॉ. शशिकांत साळवे | ९८ |
| २६ | संस्कृत काव्यशास्त्रातील अभिजातवादाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव | प्रा. पंकजा माधव वाघमारे | १०३ |


Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : I Issue : XX Oct. to Dec. 2017 ISSN 2320- 4494

# संस्कृत काव्यशास्त्रातील अभिजातवादाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव

प्रा. पंकजा माधव वाघमारे
सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत विभाग
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

साहित्याचे समीक्षण किंवा काव्य-मीमांसेचे सैद्धांतिक स्वरूप म्हणजेच काव्यशास्त्र किंवा साहित्यशास्त्र होय. जे न देखे रवि,ते देखे कवि। असे जरी म्हटले जात असले किंवा यथा स्मै रोचते विश्वं तथा वै परिवर्तते। असे म्हणून कवि स्वयंभू आहे हे मान्य केलेले असले तरीदेखील आपल्या विचारांचे आणि अनुभवांचे कथन करत असताना त्याने काही मर्यादांचे पालन करणे अपेक्षित असते. ज्याप्रकारे मानवी जीवन आदर्श आदर्श व्हावे म्हणून नीतीशास्त्र, समाजशास्त्राद्वारे काही निर्बंध मानवावर घालण्यात आले तसेच कवींसाठीदेखील काही मानदंड निर्धारीत करण्यात आले ज्याची समीक्षा किंवा पर्यवेक्षण केले जाते आणि कवि काव्याच्या श्रेष्ठत्वासाठी त्याचा आश्रयदेखील घेत असतो.या सिद्धांताचे निरूपण करणे हाच काव्यशास्त्राचा विषय आहे. भामहाच्या ग्रंथाचा अलंकार हा विषय आहे तो म्हणतो - व्याकरण (शब्द), छन्दःशास्त्र, मुख्य आणि गौण असा शब्दाचा द्विविध व्यापार (अभिधान), तत्संबद्ध(अर्थ),इतिहासाश्रित कथा, लोकव्यवहार, न्याय आणि कला या गोष्टी काव्याकरिता आवश्यक आहेत असे मानावे, शब्द आणि अर्थ यांचे योग्य ज्ञान करून घेऊन, तसेच साहित्यज्ञांच्या सहवासांत राहून आणि इतर कवींच्या काव्यांचे अवलोकन करून मगच काव्यक्रियेची इच्छा बाळगावी.[१]

म्हणजेच कवींकरिता काव्यनिर्मितीसंदर्भात त्यांनी काही नियमांचे पालन करावे अशी अपेक्षा होती त्यातूनच काव्यशास्त्राची निर्मिती झाली असावी. काव्यशास्त्रातील संकल्पना कोणत्याही भाषेत मांडल्या गेल्या तरी काही अंशी त्या सारख्याच असतात. मानवी जीवनाच्या अनुभूतीतून साहित्याची निर्मिती होत असते त्यामुळे साहित्याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हे स्वाभाविक आहे म्हणून साहित्यशास्त्र हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय ठरतो. कोणत्याही साहित्याच्या अभ्यासकाला साहित्यशास्त्र हे नेहमीच मार्गदर्शक ठरते. संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये बाराव्या - तेराव्या शतकानंतर फारशी भर जर पडली नाही तरी तोपर्यंत झालेले विचारमंथन हे अन्य भाषांसाठीदेखील उपयोगी ठरले. साहित्यिक चिंतन हे प्राचीन भारतीय परंपरेतील असो किंवा परदेशातील आधुनिक परंपरेचे दर्शन घडविणारे असो ते व्हायलाच पाहिजे. वाङ्मयावर वाङ्मय निर्माण होणे म्हणजेच त्या साहित्यकृतीचे विवेचन करणे, समीक्षण करणे हा या साहित्यशास्त्रीय अभ्यासाचा एक भाग आहे. संस्कृत साहित्यशास्त्रीय विचारांचा प्रारंभ इसवी सनाच्या पहिल्या शतकात भरताच्या नाट्यशास्त्र या ग्रंथापासून झाला. नाटकेतर साहित्य समोर ठेवून साहित्याच्या विचारांचा प्रारंभ सहाव्या शतकात भामहाने केला. संस्कृत साहित्यशास्त्राची चौकट जरी पारंपारिक आणि अभिजात असली तरी आधुनिक समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय समीक्षापद्धतींना उपयोगी ठरणारी आहे. संस्कृत साहित्यशास्त्रातील मूलगामी विचारांची कालातीतता लक्षात घेतली तर त्याची उपयोजन क्षमता देखील लक्षात येते. संस्कृतातील साहित्यविषयक ग्रंथांनी तसेच त्यातील विचारांनी अन्य भाषांच्या साहित्याला प्रभावित करण्याचे फार मोठे कार्य केले आहे. संस्कृत साहित्यशास्त्रविचाराला संस्कृत साहित्याची पार्श्वभूमी होती. विशेषतः अभिजात साहित्य भास, शूद्रक, कालिदास, बाणभट्ट, भवभूती, विशाखदत्त, भट्टनारायण यांचे श्रव्य गद्य दृश्य काव्य या शास्त्रकारांच्या नजरेसमोर होते. ज्या काळात हे साहित्य लिहिले गेले तो काळ राजेशाही राज्यपद्धती, सरंजामशाही समाजरचना, पितृप्रधान कुटुंबव्यवस्था, पुरूषसत्ताक सामाजिक वातावरण यांनी घडलेला होता.साहित्यात त्याचे पडसाद स्पष्ट दिसतात. साहित्यशास्त्रकारही या त्याचे पडसाद स्पष्ट दिसतात. साहित्यशास्त्रकारही या सांस्कृतिक वास्तवाचा , चौकटीचा भाग होते. त्यामुळे त्यांची परिदृष्टीदेखील या वास्तवाने घडवलेली आहे. त्याचे ठसे या साहित्यशास्त्रीय विचारावर उमटलेले आढळतात.[२]

भारतीय साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाचा एक धागा जनक साहित्यपरंपरांशी म्हणजे संस्कृत, प्राकृत साहित्यपरंपरांशी बांधलेला आहे.आधुनिक भारतीय भाषांना संस्कृतची पूर्वपीठिका आहे. त्या प्रत्यक्षपणे संस्कृतोद्भव नसल्या तरी त्यांच्या



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

घडणीत संस्कृतचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष वाटा आहे, त्यामुळे संस्कृतशी या भाषांचे संबंध जन्मापासून आजपर्यंत कमी - अधिक प्रमाणात राहिलेले आहेत.प्रत्येक भाषेतील नवेजुने संप्रदाय शोधण्याचा प्रयत्न वाङ्मयीन इतिहासात नेहमी दिसतो. संप्रदाय म्हटल्याबरोबर अनेक वाद व तात्विक विवेचनांचे जाहिरनामे आपणाला आठवतात. प्रत्येक भाषेत त्या शब्दांचा अर्थ व वापर त्या भाषेतील वाङ्मयाच्याच आधाराने ठरवला पाहिजे.एकाच भाषेतसुद्धा त्यांचा अर्थ स्थलकालपरत्वे बदलत असतो. संस्कृत वाङ्मयातसुद्धा संप्रदायाची कल्पना होती. हे रीती च्या प्रकारावरून स्पष्ट होते. पुष्कळशी संस्कृत नाटके किंवा काव्ये महाकाव्यांतील किंवा इतर प्रसिद्ध कथांशीच संबंधित होती. त्यामुळे विषयाचे नावीन्य दुय्यम ठरून, लेखकांच्या दृष्टिकोणांचे किंवा त्यांच्या रीतीचेच महत्त्व वाचकाला वाटत असले पाहिजे. आलंकारिकांनी - विशेषतः दण्डी, कुंतक इ -रीतीचे प्रकार व वैशिष्ट्ये वर्णून एकप्रकारे साहित्यसंप्रदायाची जुनी व्यवस्था लावून दिली.[३]

इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयामुळे व प्रभावामुळे मराठी भाषेत तीन मुख्य संप्रदाय प्रवाहित झाले ते म्हणजे अभिजातवाद, सौंदर्यवाद,अद्भूतरम्यतावाद आणि वास्तववाद, यथार्थवाद.

जे चिरकाल टिकून राहते ते अभिजात होय. प्राचीन साहित्याचे अनुकरण करून नवीन साहित्य निर्माण करणे ही कल्पना अभिजातवादामध्ये अंतर्भूत होते.स्वयंभू कलाकृती व अनुकरणात्मक कलाकृती या अभिजातवादाच्या अंतर्गत समाविष्ट होतात. या कलाकृती त्यांच्या कालातीत तत्त्वांमुळे, शैलीमुळे मानवी जीवनावर भाष्य करण्यास समर्थ ठरल्या आहेत.त्यांचे हे सामर्थ्य आधुनिक काळातदेखील उपकारक ठरले आहे. त्यामुळेच त्यांना अभिजात म्हटले गेले आहे. .भिजातवाद ही संकल्पना जरी इंग्रजी साहित्याशी निगडीत असली आणि आधुनिक असली तरी पण संस्कृत साहित्यात या अभिजाततेला आत्यंतिक महत्त्व दिलेले दिसून येते.अभिजातवादाच्या संदर्भात पुढील अवतरण पाहणे उपयुक्त ठरेल. समुचित शब्दांची कुशलतेने केलेली योजना, रसवत्ता हे काव्यसौंदर्याचे प्रमुख घटक होत, असे प्राचीनांचे मत होते. शब्दसौंदर्य, प्रसाद, निदोषत्व, ग्राम्यतेचा तिरस्कार, अश्लीलतेचा अधिक्षेप, अलंकाराचे औचित्य, वृत्तांचे अन्वर्थक स्थान इ. स्वरूपात हा अभिजातवाद आपले कलात्मक भान ठेवीत असे. या प्रत्येक बाबतीत कितीतरी बारकावे त्या काळात साहित्यशास्त्राच्या भाष्यकारामकडून निश्चित करण्यात आले होते. उदाहरणार्थ - देवांचा अगर थोर व्यक्तींचा संभोग शृंगार दाखवू नये इत्यादि.[४]

संस्कृत अभिजातावादाचा मराठी वरील प्रभाव- श्री.के.क्षीरसागर रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांचा निर्विवाद कलाकृती म्हणून उल्लेख करतात. संस्कृतभाषा आणि साहित्य यांचा मध्ययुगीन देशी भाषा व साहित्य यांच्याशी जवळ्या संबंध आहे. हा संबंध जसा भषिक आहे तसेच तो सांस्कृतिक आणि वाङ्मयीन पण आहे.

मध्ययुगीन भारतीय साहित्यपरंपरांच्या संदर्भात संस्कृत साहित्यपरंपरेची साहित्यमीमांसा आपण सोडू शकत नाही. खरे तर ही मीमांसा आधुनिक वाङ्मयाच्या विवेचनाला तर अपुरी पडतेच पण मध्ययुगीन भारतीय साहित्याच्याही आकलनाला पुरेशी ठरत नाही. तरीही मध्ययुगीन साहित्यिकांसमोर संस्कृत साहित्यशास्त्र होते, हे आपल्याला नाकारता यत नाही. परंपरेने आलेले हे साहित्याशास्त्र नीट समजून घेतल्याशिवाय मध्ययुगीन भारतीय साहित्यातील कितीतरी गोष्टींचा उलगडाच होऊ शकत नाही.[५]

संस्कृत, प्राकृत आणि इतर भारतीय भाषा यांच्याशी मध्ययुगापासून मराठीचे वाङ्मयीन लंप्रंध अधोरेखित करता येतील. या सर्व भाषांतील साहित्याचा मराठीतील साहित्यनिर्मितीवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

"आध्यात्मिक तत्त्वचिंतन, पौराणिक कथावाङ्मय आणि अभिजात वाङ्मय अशा तीन धारा संस्कृतमध्ये स्वतंत्रपणे वावरत या तिन्ही धारांनी प्रेरित झालेले साहित्यप्रवाह मराठीतही वाहताना दिसतात."[६]

संस्कृत ग्रांथाचा काळ आणि त्यांच्या मराठी अपतरणांचा काळ यांमध्ये अनेक शतकांचे अंतर होते. या काळामध्ये समाजजीवनात वेगवेगळे फ्रदल झाले. जीवनमूल्यांमध्ये पण परिवर्तन झाले. असे असले तरी मराठी कवींना पूर्वपरंपरेचे भान आहे. या कवींनी परंपरेत मान्यता पावलेल्या ग्रंथाच्या आधाराने रचना केली. संस्कृत ही भारताची ज्ञानभाषा आहे तशाच ती धर्मभाषाही आहे आणि त्यमुळेच मध्ययुगीन देशी साहित्य धर्मप्रधान असल्याने त्यावर संस्कृतचा सर्वाधिक प्रभाव



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

घडणीत संस्कृतचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष वाटा आहे, त्यामुळे संस्कृतशी या भाषांचे संबंध जन्मापासून आजपर्यंत कमी - अधिक प्रमाणात राहिलेले आहेत.प्रत्येक भाषेतील नवेजुने संप्रदाय शोधण्याचा प्रयत्न वाङ्मयीन इतिहासात नेहमी दिसतो. संप्रदाय म्हटल्याबरोबर अनेक वाद व तात्विक विवेचनांचे जाहिरनामे आपणाला आठवतात. प्रत्येक भाषेत त्या शब्दांचा अर्थ व वापर त्या भाषेतील वाङ्मयाच्याच आधाराने ठरवला पाहिजे.एकाच भाषेतसुद्धा त्यांचा अर्थ स्थलकालपरत्वे बदलत असतो. संस्कृत वाङ्मयातसुद्धा संप्रदायाची कल्पना होती. हे रीती च्या प्रकारावरून स्पष्ट होते. पुष्कळशी संस्कृत नाटके किंवा काव्ये महाकाव्यांतील किंवा इतर प्रसिद्ध कथांशीच संबंधित होती. त्यामुळे विषयाचे नावीन्य दुय्यम ठरून, लेखकांच्या दृष्टिकोणांचे किंवा त्यांच्या रीतीचेच महत्त्व वाचकाला वाटत असले पाहिजे. आलंकारिकांनी - विशेषतः दण्डी, कुंतक इ -रीतीचे प्रकार व वैशिष्ट्ये वर्णून एकप्रकारे साहित्यसंप्रदायाची जुनी व्यवस्था लावून दिली.[३]

इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयामुळे व प्रभावामुळे मराठी भाषेत तीन मुख्य संप्रदाय प्रवाहित झाले ते म्हणजे अभिजातवाद, सौंदर्यवाद,अद्‌भूतरम्यतावाद आणि वास्तववाद, यथार्थवाद.

जे चिरकाल टिकून राहते ते अभिजात होय. प्राचीन साहित्याचे अनुकरण करून नवीन साहित्य निर्माण करणे ही कल्पना अभिजातवादामध्ये अंतर्भूत होते.स्वयंभू कलाकृती व अनुकरणात्मक कलाकृती या अभिजातवादाच्या अंतर्गत समाविष्ट होतात. या कलाकृती त्यांच्या कालातीत तत्त्वांमुळे, शैलीमुळे मानवी जीवनावर भाष्य करण्यास समर्थ ठरल्या आहेत.त्यांचे हे सामर्थ्य आधुनिक काळातदेखील उपकारक ठरले आहे. त्यामुळेच त्यांना अभिजात म्हटले गेले आहे. अभिजातवाद ही संकल्पना जरी इंग्रजी साहित्याशी निगडीत असली आणि आधुनिक असली तरी पण संस्कृत साहित्यात या अभिजाततेला आत्यंतिक महत्त्व दिलेले दिसून येते.अभिजातवादाच्या संदर्भात पुढील अवतरण पाहणे उपयुक्त ठरेल. समुचित शब्दांची कुशलतेने केलेली योजना, रसवत्ता हे काव्यसौंदर्याचे प्रमुख घटक होत, असे प्राचीनांचे मत होते. शब्दसौंदर्य, प्रसाद, निदोषत्व, ग्राम्यतेचा तिरस्कार, अश्लीलतेचा अधिक्षेप, अलंकाराचे औचित्य, वृत्तांचे अन्वर्थक स्थान इ. स्वरूपात हा अभिजातवाद आपले कलात्मक भान ठेवीत असे. या प्रत्येक बाबतीत कितीतरी बारकावे त्या काळात साहित्यशास्त्राच्या भाष्यकारामकडून निश्चित करण्यात आले होते. उदाहरणार्थ - देवांचा अगर थोर व्यक्तींचा संभोग शृंगार दाखवू नये इत्यादि.[४]

संस्कृत अभिजातावादाचा मराठी वरील प्रभाव- श्री.के.क्षीरसागर रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांचा निर्विवाद कलाकृती म्हणून उल्लेख करतात. संस्कृतभाषा आणि साहित्य यांचा मध्ययुगीन देशी भाषा व साहित्य यांच्याशी जवळया संबंध आहे. हा संबंध जसा भषिक आहे तसेच तो सांस्कृतिक आणि वाङ्मयीन पण आहे.

मध्ययुगीन भारतीय साहित्यपरंपरांच्या संदर्भात संस्कृत साहित्यपरंपरेची साहित्यमीमांसा आपण सोडू शकत नाही. खरे तर ही मीमांसा आधुनिक वाङ्मयाच्या विवेचनाला तर अपुरी पडतेच पण मध्ययुगीन भारतीय साहित्याच्याही आकलनाला पुरेशी ठरत नाही. तरीही मध्ययुगीन साहित्यिकांसमोर संस्कृत साहित्यशास्त्र होते, हे आपल्याला नाकारता येत नाही. परंपरेने आलेले हे साहित्याशास्त्र नीट समजून घेतल्याशिवाय मध्ययुगीन भारतीय साहित्यातील कितीतरी गोष्टींचा उलगडाच होऊ शकत नाही.[५]

संस्कृत, प्राकृत आणि इतर भारतीय भाषा यांच्याशी मध्ययुगापासून मराठीचे वाङ्मयीन लंप्रंध अधोरेखित करता येतील. या सर्व भाषांतील साहित्याचा मराठीतील साहित्यनिर्मितीवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

“आध्यात्मिक तत्त्वचिंतन, पौराणिक कथावाङ्मय आणि अभिजात वाङ्मय अशा तीन धारा संस्कृतमध्ये स्वतंत्रपणे वावरत या तिन्ही धारंनी प्रेरित झालेले साहित्यप्रवाह मराठीतही वाहताना दिसतात.”[६]

संस्कृत ग्रंथाचा काळ आणि त्यांच्या मराठी अपतरणांचा काळ यांमध्ये अनेक शतकांचे अंतर होते. या काळामध्ये समाजजीवनात वेगवेगळे फ्रदल झाले. जीवनमूल्यांमध्ये पण परिवर्तन झाले. असे असले तरी मराठी कवींना पूर्वपरंपरेचे भान आहे. या कवींनी परंपरेत मान्यता पावलेल्या ग्रंथाच्या आधाराने रचना केली. संस्कृत ही भारताची ज्ञानभाषा आहे तशाच ती धर्मभाषाही आहे आणि त्यमुळेच मध्ययुगीन देशी साहित्य धर्मप्रधान असल्याने त्यावर संस्कृतचा सर्वाधिक प्रभाव



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. मध्ययुगीन मराठी लेखकांच्या लिखणावर बहुतांशी संस्कृतचा प्रभाव आहे. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या घडणीत संस्कृत परंपरेचे योगदान मोठे आहे. कोणत्याही ग्रंथाचा आधार न घेता रचना करणे हे मध्ययुगीन मराठी काव्याला अपरिचित होते. रामायण, महाभारत आणि भागवत हे प्रमुख आधारग्रंथ आहेत.

संस्कृत अभिजातवादाच्या प्रभावातून निर्माण झालेले मराठी साहित्य -मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या आकलन-मूल्यमापनासाठी भरतमुनींपासून जगन्नाथापर्यंतच्या परंपरेतील अभिजात काव्यशास्त्राचा प्रभाव नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर या महानुभव विदग्ध कवींप्रमाणे सामराज ते मोरीपंत या पंडिती परंपरेवर मोठा आहे. संस्कृतमधील अभिजात साहित्याने देशी भाषांना साहित्य निर्मितीची वाट दाखविली आहे.

तीरे संस्कृतांचि गहने। तोडूनि म-हाटिया शब्दसोपानें
रचिली धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवे (ज्ञानेश्वरी ११/९)

संस्कृतातील वेद, उपनिषदे, धर्मशास्त्रे, सूत्रवाङ्मय, भाष्यग्रंथ, नारद व शांडिल्य यांची भक्तिसूत्रे, गीता, भागवत, योगवासिष्ठ यातील तत्त्वविचारांच्या आधारेनच नाथ, महानुभव, वारकरी, दत्त, रामदासी इत्यादी धर्मसंप्रदायातील संतांचे तत्त्वप्रधान वाङ्मय जन्माला आले. या संदर्भात श्रीमद्भगवद्गीता आणि श्रीमद्भागवत या दोन ग्रंथाचा सर्वस्पर्शी प्रभाव लक्षात येईल.

ज्ञानेश्वर, विश्वनाथ बाळापूरकर, भास्करभट्ट बोरीकर, एकनाथ, दासोपंत, त्र्यबकराय, वामनपंडित, कृष्णदयार्गव, श्रीधर, मोरोपंत, श्यामराज, जनपंडित इत्यादी नावे या संदर्भात प्रामुख्याने द्यावी लागतील.

रामायण, महाभारत, भागवत हे मराठी कवींचे प्रमुख आधारग्रंथ आहेत. अध्यात्मरामायण, आनंदरामायण, हनुमन्नाटक, जैमिनी अश्वमेध, हरिवंश, भारतमंजरी यांची त्यांनी पूरक म्हणून वापर केला. पुराणांपैकी पद्मपुराण, स्कंदपुराण, विष्णुपुराण, मार्कण्डेयपुराण, शिवपुराण, भविष्यपुराण यांच्यावर मराठी कवींचा अधिक भर आहे. कथासरित्सागर, दशकुमारचरित, कादबरी यासारख्या सखोपकथनांनी भरलेल्या ग्रंथांचा त्यांनी जरूरीपुरता वापर केला. मनोरंजन, उदबोधन आणि सौंदर्यनिर्मिताची लालसा या हेतूंनी या कथावाङ्मयात सतत भरच पडत आलेली आहे. सद्गुणांचे संस्कार करणारे आणि संस्कृतीची ओळख पटविणारे हे संस्कृत वाङ्मय भरणपोषण झालेले आहे.[७]

**उपसंहार** - संस्कृत काव्यशास्त्र हे प्राचीन आणि साहित्याचे सांगोपांग विवेचन करणारे साहित्याचे शास्त्र आहे. संस्कृत साहित्याने आणि अर्थातच साहित्यशास्त्रकारांनी ठरवून दिलेल्या अभिजात साहित्याच्या चौकटीचा प्रभाव विशेषतः मध्ययुगीन मराठी साहित्यावर पडलेला दिसून येतो. या अभिजात कलाकृतींना आदर्श मानून, तिचे अनुकरण करून [illegible]ीमध्ये रचना करण्यात आलेल्या साहित्यकृतींची यादी फार मोठी आहे. संस्कृत काव्याशास्त्रातील अभिजातवादाच्या प्रभाव आणि त्यातून मराठी साहित्याची झालेली निर्मिती याचा शोध आणि बोध घेणे हे या शोधनिबंधाचे प्रयोजन आहे.

-o-

References-

१. देशपांडे ग. त्र्यं., भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंम्बई, पृष्ठ क्र. ६
२. सरोज देशपांडे, संस्कृत साहित्याची तोंडओळख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १८
३. वि. ना. ढवळे, साहित्याचे तत्त्वज्ञान, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. २८३
४. प्रा. डॉ. इंगळे विजय, पदवी व पदव्युत्तर वर्गांकरिता साहित्यशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. ११६
५. मंचरकर रत्नाकर बपूराव, तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ११३
६. मंचरकर रत्नाकर बापूराव, तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ११३
७. मंचरकर रत्नाकर बापूराव, तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ९१



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**संदर्भग्रंथसूची-**

१. सरोज देशपांडे, संस्कृत साहित्याची तोंडओळख, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
२. वि. ना. ढवळे, साहित्याचे तत्त्वज्ञान, कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे
३. प्रा. डॉ. इंगळे विजय, पदवी व पदव्युत्तर वर्गांकरिता साहित्यशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
४. देशपांडे ग. त्र्यं., भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
५. डहाके वसंत आबाजी, मराठी समीक्षेची सद्यःस्थिती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
६. मंचरकर रत्नाकर बापूराव, तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे
७. उपाध्याय बलदेव आचार्य, संस्कृत साहित्य का इतिहास
८. पाटणकर रा. भा., साहित्यविचार आणि सौंदर्यशास्त्र

❖❖❖❖